- प्रकरण चौथे -

सांगली जिल्हा प्राथमिक शिक्षक बँकेची

१९८१ ते १९९७ या कालावधीतील आर्थिक स्थिती.

## प्रकरण चौथे

## "प्राथमिक शिक्षक सहकारी बँकेची १९८० ते १९९४ या काळातील आर्थिक स्थिती"

### ४·१ प्रस्तावना :-

समाजवादी समाजरचनेची आणि आर्थिक व्यवस्थापनात योग्य ते बदल घडवून आणण्याच्या गरजेतून नागरी बँकांची निर्मिती झालेली आहे· देशातील प्रगतीचा व आर्थिक व्यवस्थापनाचा पाया प्रामुख्याने बँकिंग व्यवसाय असल्याने नागरीकांचे जीवनमान उंचविण्याचे माध्यमही बँका आहेत· जिल्हा मध्यवर्ती बँकांनी ग्रामीण पतपुरवठ्याच्या कार्यात बहुमोल कामगिरी केलेली आहे· तसेच नागरी व अर्धनागरी विभागातील असंख्य लघुउद्योग, कुटिरउद्योग, वाहतूक यंत्रणा, स्वयंरोजगार, छोटे कारागीर, लहान व्यापारी, व्यावसायिक, नोकरदार वर्ग व सामाजातील आर्थिकदृष्ट्या दुर्बल घटक यांना आर्थिक सहाय्य करण्याचे काम व बँकिंग विषयक सुविधा उपलब्ध करुन देण्याचे कार्य नागरी बँका कसोशीने पार पाडतात· देशाच्या प्रगतीच्या वाटचालीत नागरी सहकारी बँकांनी खूप मोठा हातभार लावला आहे· म्हणून देशाच्या अर्थव्यवस्थेत नागरी सहकारी बँकांना महत्वाचे स्थान प्राप्त झाल्याचे दिसून येते·

सदर प्रकरणात प्राथमिक शिक्षक सहकारी बँक लिमिटेड, सांगली या बँकेचा गेल्या १९९१ वर्षातील म्हणजेच १९८१ ते १९९४ या कालखंडातील आर्थिक स्थितीचा अभ्यास केला आहे· असा अभ्यास करीत असताना त्या घटकाची पार्श्वभूमी व त्या घटकाचे महत्व आणि त्या घटकाविषयी बँकेने केलेली प्रगती विचारात घेतली आहे·

४.२ प्राथमिक शिक्षक सहकारी बँकेचे भांडवल :-

नागरी सहकारी बँकेची स्थापना करण्याचे प्रयोजन विचारार्थ घेतल्यास पहिला प्रश्न उद्भवतो तो भांडवलाचा कारण भाग भांडवल ही बाब बँकेची पुढील साधनसामग्री उभी करण्याच्या दृष्टीने महत्वाची असते. नागरी सहकारी बँकेच्या संपत्तीचे सर्वसाधारणपणे दोन भाग असतात. स्वभांडवल ( Own Capital ) आणि दुसरा म्हणजे बाहेरून उभारलेली कर्जे.

बँकेच्या स्वभांडवलामध्ये बँकेचे वसूल भांडवल आणि कायम स्वरूपाचे निधी याचा समावेश असतो. स्वभांडवलामध्ये सामान्यत: बँकेचे भाग भांडवल, गंगाजळी व कायम स्वरूपाच्या निधीचा समावेश केलेला असतो.

४.३ प्राथमिक शिक्षक सहकारी बँकेच्या भाग भांडवलातील प्रगती :-

प्राथमिक शिक्षक बँकेच्या अधिकृत भाग भांडवलात १९८१ ते १९९४ या काळात झालेल्या वाढीची माहिती पुढीलप्रमाणे :-

तक्ता क्र.४.१ (आकडे रुपयात)

प्राथमिक शिक्षक बँकेच्या अधिकृत भाग भांडवलातील प्रगती

| सन | अधिकृत भाग भांडवल |
|---|---|
| १९८१ | ७५,००,०००/- |
| १९८२ | ७५,००,०००/- |
| १९८३ | ७५,००,०००/- |
| १९८४ | ७५,००,०००/- |
| १९८५ | ७५,००,०००/- |
| १९८६ | ७५,००,०००/- |
| १९८७ | १,०३,५३,४१०/- |

| सन | अधिकृत भाग भांडवल |
|---|---|
| १९८८ | २,००,००,०००/- |
| १९८९ | २,००,००,०००/- |
| १९९० | २,००,००,०००/- |
| १९९१ | २,००,००,०००/- |
| १९९२ | २,००,००,०००/- |
| १९९३ | २,००,००,०००/- |
| १९९४ | २,००,००,०००/- |

संदर्भ :- प्राथमिक शिक्षक बँकेचे अहवाल.

वरील तक्त्यावरुन असे दिसून येते की, १९८१ साली प्राथमिक शिक्षक बँकेचे भाग भांडवल ७५ लाख रुपयांचे होते. १९८६ पर्यन्त हे अधिकृत भाग भांडवलात वाढ झाली. ते १ कोटी ३ लाख ५३ हजार ४९० इतके झाले होते. यानंतर १९८८ मध्ये २ कोटी इतकी वाढ झाली. यानंतर १९९४ अखेर ही वाढ स्थिर आहे. १९९४ मध्ये २ कोटी अधिकृत भाग भांडवल झाले आहे. बँकेच्या अधिकृत भाग भांडवलातील प्रगती ही उल्लेखनीय आहे.

४.४ स्वभांडवल किंवा मालकीचे भांडवल :-

प्राथमिक शिक्षक बँकेच्या स्वभांडवलात १९८१ ते १९९४ या काळात झालेल्या वाढीची प्रगतीची माहिती तक्त्यातील आकडेवारीनुसार देण्यात आली आहे.

तक्ता क्र.४.२

प्राथमिक शिक्षक बँकेच्या मालकीच्या भांडवलातील प्रगती

(आकडे लाखात)

| अ.क्र. | वर्ष | स्वभांडवल | सरासरी वार्षिक वाढ | % वाढ |
|---|---|---|---|---|
| १) | १९८०-८१ | ६८.२० | ०.७५ | १.११ |
| २) | १९८१-८२ | ६८.२३ | ०.०३ | ०.०४ |
| ३) | १९८२-८३ | ६८.२१ | -०.०२ | -०.०३ |
| ४) | १९८३-८४ | ६९.१६ | ०.९५ | १.३९ |
| ५) | १९८४-८५ | ६९.०२ | -०.१४ | -०.२० |
| ६) | १९८५-८६ | ६८.९० | -१२ | -०.१७ |
| ७) | १९८६-८७ | १०३.५३ | ३४.६३ | ५०.२६ |
| ८) | १९८७-८८ | १२९.९० | -२६.३७ | -२५.४७ |
| ९) | १९८८-८९ | १३९.९० | ९.६३ | ७.४१ |
| १०) | १९८९-९० | १४२.८६ | ३.३३ | २.३९ |
| ११) | १९९०-९१ | १४४.९६ | २.१० | १.४७ |
| १२) | १९९१-९२ | १४८.३६ | ३.४० | २.३५ |
| १३) | १९९२-९३ | १५०.२३ | १.८७ | १.२६ |
| १४) | १९९३-९४ | १५१.४५ | १.२२ | ०.८१ |

संदर्भ :- अहवाल - प्राथमिक शिक्षक बँक.

१९८०-८१ मध्ये या बँकेचे मालकीचे भांडवल ६८.२० लाख रुपये होते. त्यामध्ये वाढ होऊन १९९४ मध्ये १५१.४५ लाख रुपये इतके झाले आहे.

१९८०-८१ मध्ये स्वभांडवलातील ०.७५ लाख रुपये होती व १९९४ मध्ये सरासरी वार्षिक वाढ १.२२ लाख इतकी झाली आहे. यावरून बँकेच्या स्वभांडवलात वाढ झाल्याचे दिसून येते.

खेळते भांडवल :-

खेळत्या भांडवलाला एकूण भांडवल असेही म्हणतात. नागरी सहकारी बँकांच्या आर्थिक व्यवहारात खेळत्या भांडवलाला अधिक महत्व असते. खेळत्या भांडवलामध्ये वसूल भाग भांडवल रिझर्व्ह व इतर निधी ठेवी प्रॉव्हिडंड फंड व इतर देणे यांचा समावेश असतो.

४.५ प्राथमिक शिक्षक सहकारी बँकेचे खेळते भांडवल :-

प्राथमिक शिक्षक बँकेच्या खेळत्या भांडवलात झालेली वाढीची आकडेवारी पुढील तक्त्यात दिली आहे.

तक्ता क्र.४.३

प्राथमिक शिक्षक बँकेच्या खेळत्या भांडवलातील प्रगती

(आकडे लाखात)

| वर्ष | खेळते भांडवल | सरासरी वार्षिक वाढ | % वाढ |
|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ |
| १९८०-८१ | २२८.८५ | २०.४८ | ९.८३ |
| १९८१-८२ | ३०७.४३ | ७८.५८ | ३४.३४ |
| १९८२-८३ | ३४८.८० | ४१.३७ | १३.४६ |

| १ | २ | ३ | ४ |
|---|---|---|---|
| १९८३-८४ | ३८६•४५ | ३७•६४ | १०•७९ |
| १९८४-८५ | ५४४•२० | १५७•७६ | ४०•८२ |
| १९८५-८६ | ६५५•४१ | १११•२३ | २०•४४ |
| १९८६-८७ | ८४०•४८ | १८५•०४ | २८•२३ |
| १९८७-८८ | ९७९•१४ | १३८•६६ | १६•५० |
| १९८८-८९ | १२५५•५१ | २७६•३७ | २८•२३ |
| १९८९-९० | १५९६•७३ | ३४१•२२ | २७•१८ |
| १९९०-९१ | १९१७•८३ | ३२१•१० | २०•११ |
| १९९१-९२ | २१०६•४१ | १८८•५८ | ९•८३ |
| १९९२-९३ | २३५८•८३ | २५२•४२ | ११•९८ |
| १९९३-९४ | २७७३•४३ | ४१४•६० | १७•५८ |
| १९९४-९५ | | | |

संदर्भ :- प्राथमिक शिक्षक बँकेचे वार्षिक अहवाल•

१९८०-८१ मध्ये प्राथमिक शिक्षक बँकेचे खेळते भांडवल २२८•८५ लाख रुपये होते• सरासरी वार्षिक वाढ २०•४८ इतकी झाली होती• व टक्के वाढ ९•८३ इतकी झाली होती•

यामध्ये वाढ होऊन १९९३-९४ मध्ये बँकेचे खेळते भांडवल २७७३•४३ लाख रुपये झाले आहे• सरासरी वार्षिक वाढ ४१४•६० लाख रुपये नी झाली आहे व % वाढ १७•५८ इतकी झाली आहे•

वरील आकडेवारीवरून प्राथमिक शिक्षक बँकेचे खेळते भांडवलामध्ये वाढ होताना दिसते आहे•

४.६ सांगली जिल्हा प्राथमिक शिक्षक बँकेचे सभासदत्व :-

नागरी सहकारी बँकांचे सभासदत्व दोन प्रकारचे असते. त्यामध्ये

१) "अ" वर्ग :-

यामध्ये बँकेच्या कार्यक्षेत्रातील कोणाही करारपात्र प्राथमिक शिक्षकास सभासद होता येते. सभासद होण्यासाठी एका भागाची रक्कम भरावी लागते.

२) "ब" वर्ग :-

प्रवेश शुल्क ठरलेली वार्षिक वर्गणी भरून घेऊन नाममात्र सभासदास सभेस उपस्थित राहण्यास किंवा सभेच्या कामात भाग घेण्याचा अधिकार असत नाही. कर्जदार सभासदांना जामिनदार राहण्यास सोईचे व्हावे या हेतूने त्यांना नाममात्र सभासद करून घेण्यात येते.

प्राथमिक शिक्षक बँकेचे सभासदत्व :-

प्राथमिक शिक्षक बँकेच्या पोटनियमानुसार खालील अटी पूर्ण करणाऱ्या इसमास बँकेचे सभासद होता येते.

१) व्यक्ती ही सांगली जिल्ह्यात राहणारी असली पाहिजे.

२) ती विशिष्ठ व्यक्ती प्राथमिक शिक्षक असली पाहिजे.

३) प्राथमिक शिक्षकाशिवाय मान्यताप्राप्त खाजगी शाळांमध्ये शिक्षक असणाऱ्या व्यक्तीसही सभासदत्व मिळते.

अशा व्यक्तीने सभासदत्वासाठी कमित कमी एका भागाची पूर्ण रक्कम व प्रवेश फी भरून केलेला अधिकृत अर्ज संचालक मंडळाने संमत केलेला असला पाहिजे.

## नाममात्र सभासदत्व :-

बँक काही प्राथमिक शिक्षकांना तात्पुरत्या गरजेपोटी कर्ज देते. (उदा. सोने तारण कर्ज, मुदत ठेव पावती कर्ज, सिक्युरिटी तारण कर्ज) अशा वेळी त्यांना नाममात्र सभासद करून घेऊन कर्ज देते. अशा व्यक्तींना साधे ५/- प्रवेश फी घेऊन नाममात्र सभासद करून घेतले जाते.

प्राथमिक शिक्षक बँकेची नियमित सभासद संख्या व नाममात्र सभासद संख्या याविषयी माहिती देणारा तक्ता पुढे दिला आहे. तो पुढीलप्रमाणे :-

तक्ता क्र.४.४

प्राथमिक शिक्षक बँकेच्या नियमित व नाममात्र

सभासद संख्येतील प्रगती

| वर्ष | नियमित सभासद | नाममात्र सभासद |
|---|---|---|
| १९८१ | ७,१४८ | ६१ |
| १९८२ | ७,१२७ | १०९ |
| १९८३ | ७,०९७ | १५४ |
| १९८४ | ७,१४२ | १८९ |
| १९८५ | ७,१२४ | १९७ |
| १९८६ | ७,१२४ | ३२३ |
| १९८७ | ६,९५९ | ४३८ |
| १९८८ | ६,१२१ | ५२२ |
| १९८९ | ७,६३६ | १७१ |
| १९९० | ७,४५० | ३९७ |
| १९९१ | ७,६५७ | ३५२ |
| १९९२ | ७,८४९ | ३०४ |
| १९९३ | ७,८३९ | २९७ |
| १९९४ | ७,९०५ | ३३० |

संदर्भ :- प्राथमिक शिक्षक बँकेचे अहवाल.

१) <u>नियमित सभासद</u> :-

प्राथमिक शिक्षक बँकेचे १९८१ मध्ये अभ्यासाच्या सुरुवातीच्या कालखंडात ७१४८ इतके सभासद होते. ज्यावेळी नवीन सभासद झाले, त्यावेळी सभासद संख्या वाढलेली आहे व ज्यावेळी सभासद मयत झाले व राजीनामे दिले, त्यावेळी सभासद संख्या कमी झाली आहे. हे मध्यंतरीच्या कालावधीत दिसून येते. १९८१ च्या तुलनेत १९९४ मध्ये नियमित सभासद संख्येत वाढ झाली आहे. ही संख्या ७,९०५ इतकी झाली आहे. यावरून एकंदरीत असा निष्कर्ष काढता येईल की, नियमित सभासद संख्येत वाढ होत आहे.

२) <u>नाममात्र सभासद</u> :-

नाममात्र सभासद संख्येतही वाढ झालेली वरील आकडेवारीवरून दिसून येते. १९८१ मध्ये नाममात्र सभासद संख्या केवळ ६१ होती. तीमध्ये वाढ होऊन १९९४ मध्ये ३३० इतकी झाली आहे.

४.७ <u>प्राथमिक शिक्षक बँकेच्या ठेवी</u> :-

बँकेची प्रगती, बँकेचे स्थैर्य, बँकेचा विकास हा बँकेतील ठेवीच्या प्रमाणावर अवलंबून असतो. व्यापारी बँकाप्रमाणेच प्राथमिक बँक ही बचत ठेव, मुदत ठेव, चालू ठेव, पिग्मी ठेव, पेन्शन ठेव, रिकरिंग ठेव, पेन्शन ठेव व अन्य प्रकारच्या ठेवी स्विकारतात. अशा ठेवी व्यक्तीशः स्वतःच्या अगर, संयुक्त नावाने, अज्ञान मुलांच्या नावाने, किंवा खाजगी व्यवसायिक भागिदारी पतपेढ्या खाजगी व सार्वजनिक मर्यादित कंपन्या, ऐच्छिक संघटना व मंडळे नोंदलेल्या व बिगर नोंदलेल्या संस्था, विश्वस्त संस्था इत्यादीकडून घेतलेल्या असतात.

बँकांच्या बाहेरून उभारलेल्या कर्जामध्ये ठेवींचा सिंहाचा वाटा असतो. ज्या प्रमाणात बँका ठेवी गोळा करतात, त्या प्रमाणात त्या जनतेचा विश्वास निर्माण करीत असतात. म्हणूनच ठेवीच्या प्रमाणात बँकेची प्रतिमा उज्वल होते.

अ) ठेवी विमा योजना :-

भारतात १९६१ साली ठेव विमा योजना चालू केली. प्रारंभी ही योजना नागरी सहकारी बँकांना लागू केली आहे. सध्या १,००,०००/- रुपयापर्यन्त सर्व ठेवींना विम्याचे संरक्षण मिळते. त्यासाठी बँकेला ४ पैसे प्रती शेकडा प्रतिवर्षी ठेवीच्या प्रमाणात हप्ता भरावा लागतो. ठेव विमा योजना नागरी सहकारी बँकांना लागू करण्यात आल्यामुळे त्यांच्या ठेवीत लक्षणीय वाढ झाली आहे.

ब) ठेवीवरील व्याज :-

ठेवीदारांना त्यांनी बँककडे सुपूर्त केलेल्या ठेवीवर योग्य मोबदला मिळणे आवश्यक असते. रिझर्व्ह बँका ठेवीवरील व्याजदराबाबत नागरी सहकारी बँकांना वेळोवेळी धनादेश देत असते.

प्राथमिक शिक्षक बँकेच्या ठेवी पुढीलप्रमाणे दर्शविलेल्या आहेत.

## तक्ता क्र.४.५

### प्राथमिक शिक्षक बँकेच्या ठेवी

( आकडे लाखात )

| साल | मुदत ठेवी | बचत ठेवी | एकूण ठेवी | सरासरी वार्षिक वाढ | टक्के वाढ |
|---|---|---|---|---|---|
| १९८१ | ७५.४४ | १३.१७ | ८८.६१ | १७.८ | २५.१४ |
| १९८२ | ९३.९३ | १७.२५ | १११.१८ | २२.५९ | २५.५० |
| १९८३ | ११३.७३ | २२.३८ | १३६.११ | २४.९२ | २२.४१ |
| १९८४ | १४१.१६ | ३१.४० | १७२.५६ | ३६.४५ | २६.७८ |
| १९८५ | १९६.०० | ४५.९५ | २४१.९३ | ६९.३७ | ४०.२० |
| १९८६ | २५३.०० | ७५.४७ | ३२८.४७ | ८६.५४ | ३५.७७ |
| १९८७ | २८४.९३ | १०५.१३ | ३९०.०६ | ६१.५९ | १८.७५ |
| १९८८ | ३४६.२३ | १३५.४४ | ४८१.६७ | ९१.६१ | २३.४९ |
| १९८९ | ४२६.३९ | १५७.७७ | ५८४.१७ | १०२.५० | २१.२८ |
| १९९० | ६१३.३७ | १७६.०१ | ७८९.३८ | २०५.२१ | ३५.१३ |
| १९९१ | ८१७.५८ | २५८.७० | १०७६.२८ | २८६.९० | ३६.३५ |
| १९९२ | ९६७.९८ | २६८.३७ | १२३६.३६ | १६०.८ | १४.८७ |
| १९९३ | १२५०.१४ | २४९.३९ | १४९९.५३ | २६३.१७ | २१.५१ |
| १९९४ | १६३७.०४ | २७९.२३ | १९१६.२७ | ४१६.७५ | २७.७९ |

संदर्भ :- प्राथमिक शिक्षक बँक अहवाल.

ठेवी :-

बँकेचा पोटनियम क्रमांक ४३ अन्वये व रिझर्व्ह बँकेच्या आदेशानुसार विविध प्रकारच्या ठेवी स्विकारते. या बँकेस रिझर्व्ह बँकेचे लायसेन्स व ठेवीस विमा संरक्षण असल्यामुळे सभासदांच्या बरोबर बिगर सभासदांच्याही इतर नागरी बँकाप्रमाणे समाजात विश्वास निर्माण करुन ठेवी स्विकारल्या आहेत. ठेवीदारांची रुपये १,००,०००/- पर्यन्तचे ठेवीस विम्याचे संरक्षण दिले जाते.

वरील तक्त्यातील आकडेवारीनुसार असे दिसून येते की, बँकेच्या मुदत ठेवी बचत ठेवी या सतत वाढत आहेत.

१९८१ मध्ये एकूण ठेवी ८८.६१ लाख रुपये इतक्या होत्या. त्यामध्ये वाढ होऊन १९९३-९४ मध्ये १९१६.२७ लाख इतक्या वाढल्या. यामध्ये मुदत ठेवींचा वाटा १६२७.०४ लाख रुपये व बचत ठेवीचा २७९.२३ लाख रुपये चा आहे.

४.८ सांगली जिल्हा प्राथमिक शिक्षक बँकेचे कर्ज व्यवहार :-

नागरी सहकारी बँका विविध प्रकारच्या ठेवी गोळा करतात आणि त्यामधून आपल्या खातेदारांना निरनिराळ्या कामासाठी निरनिराळ्या प्रकारची कर्जे देतात. बँकेला विविध प्रकारचा खर्च भागवावा लागतो. त्यासाठी बँकेकडे काही उत्पन्न असावे लागते. आणि हा उत्पन्नाचा मार्ग म्हणजे कर्जे देऊन त्या-वरती व्याज मिळविणे. ठेवी प्रमाणेच कर्ज देणे हेही नागरी सहकारी बँकांचे एक प्रमुख कार्य आहे. ही कर्जे बँका गरजू व्यापारी छोटे कारखानदार, पगारदार, नोकरदार आणि ग्रामीण कारागीर व लघुउद्योजक, व्यवसायिक यांना देतात.

१) पगार तारण कर्ज :-

सभासदांचा पगार तारण घेऊन त्यांना तीन प्रकारे कर्ज पुरवठा केला जातो.

१. जामिनकी कर्ज -

हे कर्ज रुपये ५०,०००/- पर्यन्त ५६ मासिक परत फेडीच्या हप्त्याने १६% व्याजदराने दिले जाते.

२. आकस्मित कर्ज -

हे कर्ज रुपये १५,०००/- पर्यन्त जामिन न घेता ३६ मासिक परत फेडीच्या हप्त्याने १६% व्याजदराने आकस्मिक कारणाकरिता दिले जाते.

३. क्लिन - कॅश - क्रेडिट -

हे कर्ज रुपये ५,०००/- पर्यन्त वार्षिक परत फेडीच्या कराराने १ वर्षाकरिता दिले जाते. व्याजदर १६% आहे.

२) हायरपर्चेस कर्ज :-

दुचाकी वाहन तारण कर्ज रुपये २५,०००/- पर्यन्त व गृहउपयोगी वस्तू रुपये १२,०००/- पर्यन्त ६० मासिक हप्त्याने १६% व्याजदराने दिले जाते.

३) घरबांधणी कर्ज :-

घरबांधणीसाठी सभासदांना रुपये १,००,०००/- पर्यन्त १६% सवलतीचे व्याजदराने कर्ज दिले जाते. आज अखेर सभासदांकडे रुपये १,०२,५९,४२६ इतकी कर्जबाकी आहे.

४) सोने गहाण कर्ज :-

सभासदांना १० ग्रॅम चोख सोन्यास रूपये २,४००/- प्रमाणे कर्ज दिले जाते.

५) पेन्शनर प्राथमिक शिक्षकांना कर्ज :-

पेन्शनर प्राथमिक शिक्षकांना पेन्शन पोटी रूपये १२,०००/- कर्ज पुरवठा केला जात आहे.

६) स्वयंरोजगार :-

प्राथमिक शिक्षकांच्या मुलांना शैक्षणिक कर्ज देण्या बरोबरच स्वयंरोजगार सुरू करण्यासाठी रूपये ५०,०००/- पर्यन्त कर्ज ६० हप्त्याने दिले जाते.

७) चार चाकी वाहन कर्ज पुरवठा :-

सभासदांना चार चाकी वाहन तारणावर बँकेचे कर्ज देण्याची योजना अवलंबली आहे. वाहन खरेदीसाठी रूपये २,५०,०००/- पर्यन्त कर्ज मंजूर केले जाते.

बँकेच्या पोटनियम क्रमांक ४१ अ वा ४१ क यास अनुसरून बँक कर्जपुरवठा करीत असते. ही कर्जे पुरवत असताना प्रामुख्याने शिक्षकांचा पगार तारण म्हणून घेतला जातो किंवा पगाराशिवाय इतर अन्य वस्तू तारण ठेऊन कर्जपुरवठा केला जातो. हा कर्जपुरवठा जे प्राथमिक शिक्षक सभासद आहेत, त्यांनाच केला जातो. १९८१ ते १९९४ या कालावधीत बँकेने केलेल्या कर्ज व्यवहाराची माहिती खालील तक्त्यात देण्यात आली आहे.

## तक्ता क्र.४.६

[लाख रुपये]

### प्राथमिक शिक्षक बँकेचे कर्जव्यवहार

| वर्ष | अल्पमुदत कर्जे | मध्यम मुदत कर्जे | दीर्घ मुदत कर्जे | एकूण कर्जे | सरासरी वार्षिक वाढ | % वाढ |
|---|---|---|---|---|---|---|
| १९७९–८० | १.१६ | १६१.९३ | – | १६३.०९ | – | – |
| १९८०–८१ | २.८३ | १७६.२२ | – | १७९.०५ | १५.९६ | ९.७८ |
| १९८१–८२ | ३.३१ | २३८.१७ | – | २४१.४८ | ६२.४३ | ३४.८६ |
| १९८२–८३ | १०.९० | २६१.०१ | – | २७१.९१ | ३०.४३ | १२.६० |
| १९८३–८४ | ११.७२ | २७७.०० | – | २८८.७२ | १६.८१ | ६.१८ |
| १९८४–८५ | ४९.८० | ३५९.४२ | – | ४०९.२२ | १२०.०५ | ४१.७३ |
| १९८५–८६ | ७०.९१ | ४२८.२२ | – | ४९९.१३ | ८९.९१ | २१.९७ |
| १९८६–८७ | ७०.४९ | ५६०.४८ | – | ६३०.९७ | १३१.८४ | २६.४१ |
| १९८७–८८ | ८२.३६ | ६०४.८६ | ६८.२७ | ७५५.४९ | १२४.५२ | १९.७३ |
| १९८८–८९ | २२८.८७ | ६८७.७६ | ७७.९० | ९९४.५३ | २३९.०४ | ३१.६४ |
| १९८९–९० | १६२.७५ | १००२.६७ | ८७.९३ | १२५३.३५ | २५८.८२ | २६.०२ |
| १९९०–९१ | १३१.०३ | १२६२.९४ | ९६.७९ | १४९०.७६ | २३७.४१ | १८.९४ |
| १९९१–९२ | १८८.५४ | १३१७.६४ | ९८.४८ | १६०४.६६ | ११३.०९ | ७.६४ |
| १९९२–९३ | ३१९.४७ | १३६९.६७ | ९८.०८ | १७८७.२२ | १८२.५६ | ११.३७ |
| १९९३–९४ | ४१०.७९ | १५३५.०० | ९९.६८ | २०४५.४७ | २५८.२५ | १४.४४ |

संदर्भ :- प्राथमिक शिक्षक बँक अहवाल.

१९८०-८१ मध्ये या बँकेने अल्प मुदतीची २.८३ लाख रुपये, मध्यम मुदतीची १७६.२२ लाख रुपये अशी एकूण १७९.०५ लाख रुपये इतकी कर्जे दिली होती. यामध्ये वाढ होऊन १९९४ मध्ये अल्पमुदतीची ४२०.७९ लाख रुपये, मध्यम मुदतीची १५३५.०० लाख रुपये व दिर्घ मुदतीची ९९.६८ लाख रुपये अशी एकूण २०४५.४७ लाख रुपये ची कर्जे दिली आहेत.

सुरुवातीला ही बँक दिर्घ मुदतीची कर्जे देत नव्हती. १९८८ पासून ही बँक दिर्घ मुदतीची कर्जे देत आहे.

तसेच १९८१ ला सरासरी वार्षिक वाढ ६२.४३ लाख रुपये होती. यामध्ये वाढ होऊन १९९४ ला सरासरी वार्षिक वाढ २५८.२५ लाख रुपये झाली आहे. यावरुन असे दिसून येते की, प्राथमिक शिक्षक बँकेच्या कर्जात वाढ होत आहे.

## ४.९ प्राथमिक शिक्षक बँकेची गुंतवणूक :-

बँकेच्या अनेक कार्यापैकी महत्वाचे कार्य म्हणजे पैशाची देवाणघेवाण हे होय. हे पैसे जनतेकडून जमा केले जातात आणि त्याचा उपयोग गरजूंना कर्जे देण्यासाठी केला जातो. बँकांना साधनसंपत्तीची गुंतवणूक करीत असताना सुरक्षितता, लाभता, रोखता या तत्वाचे पालन करावे लागते. नागरी सहकारी बँका या सर्वसामान्य तत्वाला अपवाद असू शकत नाहीत.

### प्राथमिक शिक्षक बँकेची गुंतवणूक :-

प्राथमिक शिक्षक बँकेला पोटनियम क्रमांक २४ नुसार गुंतवणूक करता येते व अशी गुंतवणूक बँक पुढील तीन प्रकारे करते.

१. मध्यवर्ती व राज्य सरकारचे रोखे.

२. सहकारी संस्थांचे शेअर्स.

३. इतर गुंतवणूक.

अ) मुदत बंद ठेव - महाराष्ट्र राज्य सहकारी बँक लि., मुंबई.

ब) मुदत बंद ठेव - रिझर्व्ह फंड. सांगली डी.सी.सी., बँक.

पुढील तक्त्यात सांगली जिल्हा प्राथमिक शिक्षक सहकारी बँक लिमिटेड, सांगली या बँकेने १९८१ ते १९९४ या कालावधीत केलेल्या गुंतवणूकीतील प्रगतीबाबत माहिती दिली आहे.

तक्ता क्र.४.७

प्राथमिक शिक्षक बँकेच्या गुंतवणूकीतील प्रगती ( लाख रुपयात )

| वर्ष | गुंतवणूकीतील वाढ | सरासरी वार्षिक वाढीचे प्रमाण | % वाढ |
|---|---|---|---|
| १९८१ | २७.६५ | ०.८४ | ३.१३ |
| १९८२ | ३३.६५ | ६.०० | २१.७० |
| १९८३ | ३८.७५ | ५.१० | १५.१६ |
| १९८४ | ५५.७७ | १७.०२ | ४३.९२ |
| १९८५ | ७७.३९ | २१.६२ | ३८.७७ |
| १९८६ | ८९.४९ | १२.१० | १५.६४ |
| १९८७ | १२५.२४ | ३५.७५ | ३९.९५ |
| १९८८ | १३८.७९ | १३.५५ | १०.८२ |
| १९८९ | १६३.६४ | २४.८५ | १७.९० |
| १९९० | २२३.०२ | ५९.३८ | ३६.२९ |
| १९९१ | २७८.१७ | ५५.१५ | २४.७३ |
| १९९२ | ३२२.१७ | ४४.०० | १५.८२ |
| १९९३ | ३७२.१७ | ५०.०० | १५.५२ |
| १९९४ | ५०८.३९ | १३६.२३ | ३६.६० |

संदर्भ :- प्राथमिक शिक्षक बँकेचे अहवाल.

वरील तक्त्याचे निरिक्षण केले असता, असे दिसून येते की, गुंतवणूकीत दिवसेंदिवस वाढ होत आहे.

१९८०-८१ मध्ये २७.६५ लाख रुपये ची गुंतवणूक केली होती. तीमध्ये वाढ होऊन १९९३-९४ मध्ये ५०८.३९ लाख रुपये इतकी झाली आहे. १९८०-८१ च्या तुलनेत १९९३-९४ मधील गुंतवणूकीतील वाढ ही विक्रमी वाढ आहे.

## ४.१० प्राथमिक शिक्षक बँकेचे उत्पन्न :-

प्राथमिक शिक्षक बँकेच्या उत्पन्नाच्या बाबीमध्ये कर्ज, व्याज, बँकेने गुंतवणूक केलेल्या ठेवी, कमिशन आणि कीरकोळ जमा याचा अंतर्भाव केला जातो. १९८१ ते १९९४ या कालावधीत उत्पन्नात झालेली वाढ पुढीलप्रमाणे तक्त्यात दर्शविलेली आहे.

तक्ता क्र.४.८

प्राथमिक शिक्षक बँकेचे उत्पन्न

| वर्ष | एकूण उत्पन्न | एकूण उत्पन्नातील सरासरी वार्षिक वाढ | % वाढ |
|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ |
| १९८०-८१ | २६.१७ | ५.२९ | २५.३४ |
| १९८१-८२ | ३२.६७ | ६.५० | २४.८५ |
| १९८२-८३ | ४२.६६ | ९.९८ | ३०.५६ |
| १९८३-८४ | ४७.०६ | ४.४० | १०.३२ |
| १९८४-८५ | ५३.२९ | ६.२३ | १३.२५ |
| १९८५-८६ | ७३.९० | २०.६० | ३८.६६ |

| १ | २ | ३ | ४ |
|---|---|---|---|
| १९८६–८७ | ९५·८० | २१·९० | २९·६३ |
| १९८७–८८ | १५२·५० | ५६·७० | ५९·११ |
| १९८८–८९ | १९१·३७ | ३८·८८ | २५·४९ |
| १९८९–९० | २४३·७८ | ५२·४० | २७·३८ |
| १९९०–९१ | २९९·९० | ५६·१२ | २३·०२ |
| १९९१–९२ | २७८·५८ | –२७·३२ | –६·७८ |
| १९९२–९३ | ३६१·४२ | ८२·८३ | २९·७३ |
| १९९३–९४ | ३७६·२६ | १४·८४ | ४·११ |

संदर्भ :- प्राथमिक शिक्षक बँक अहवाल·

संदर्भ – प्राथमिक शिक्षक बँक अहवाल :-

वरील तक्त्यावरुन असे दिसून येते की, प्राथमिक शिक्षक बँकेच्या एकूण उत्पन्नात दिवसेंदिवस वाढ होत आहे·

१९८१ मध्ये बँकेचे एकूण उत्पन्न ३६·१७ लाख रुपये इतके होते· ती मध्ये वाढ होऊन १९९४ मध्ये ३७६ ·२६ लाख रुपये इतके वाढले आहे· म्हणजेच उत्पन्नामध्ये १९८१ च्या तुलनेत १९९४ मध्ये ३५० पटीपेक्षा अधिक वाढ झाली आहे·

त्याप्रमाणे १९८१ मध्ये सरासरी वार्षिक वाढ ५·२९ इतकी होती· तर १९९४ मध्ये १४·८४ इतकी वाढ झाली आहे· १९८१ मध्ये % वाढ २५·३४ इतकी होती· तर १९९३ मध्ये २९·७३% वाढ व १९९४ मध्ये ४·११ टक्के वाढ झालेली दिसून येते·

यावरून असे म्हणता येईल की, प्राथमिक शिक्षक बँकेचे उत्पन्न वाढत आहे.

४.११ प्राथमिक शिक्षक बँकेचा खर्च :-

प्राथमिक शिक्षक बँकेच्या खर्चात ठेवदारांना दिलेले व्याज, नोकरपगार व भत्ते, विज, कर, विमा, टपाल, तार, टेलिफोन, ऑडिट फी, स्टेशनरी, जाहिरात छपाई, संचालक भत्ते, ३० खर्चाचा समावेश होतो. प्राथमिक शिक्षक बँकेच्या खर्चात १९८१ ते १९९४ या कालावधीत झालेली वाढ पुढील तक्त्यात दर्शविली आहे.

## तक्ता क्र. ४.९

## प्राथमिक शिक्षक बँकेचा खर्च

[आकडे लाखात]

| वर्ष | दिलेले व्याज | खेळत्या भांडवलाशी प्रमाण | व्यवस्थापन खर्च | खेळत्या भांडवलाशी प्रमाण | एकूण खर्च | सरासरी वार्षिक वाढ | % वाढ |
|---|---|---|---|---|---|---|---|
| १९८०-८१ | १७.६५ | ७.२५ | ५.८२ | २.४१ | २१.४७ | ६+९७ | १०-१० |
| १९८१-८२ | २२.२५ | ७.२४ | ७.०० | २.२७ | २९.२५ | ७.२८ | ३६.२३ |
| १९८२-८३ | ३०.३८ | ८.७१ | ८.५४ | २.४५ | ३९.९२ | १०.६७ | ३६.४७ |
| १९८३-८४ | ३१.९२ | ८.२६ | १२.२९ | ३.१९ | ४४.२१ | ४.२९ | १०.७४ |
| १९८४-८५ | ३६.१८ | ६.६५ | १३.७७ | २.५३ | ४९.९५ | ५.७४ | १२.९८ |
| १९८५-८६ | ५४.७३ | ८.०५ | १५.६९ | २.३९ | ७०.४२ | २०.४७ | ३०.९८ |
| १९८६-८७ | ७१.५६ | ८.५१ | २१.३७ | २.५४ | ९२.९३ | २२.५१ | ३१.९६ |
| १९८७-८८ | १२१.४० | १२.४० | २५.१२ | २.५७ | १४६.५२ | ५३.५९ | ५७.६६ |
| १९८८-८९ | १५३.०९ | १२.१९ | ३३.२७ | २.६५ | १८६.३६ | ३९.८४ | २७.१९ |
| १९८९-९० | २०३.८१ | १२.७६ | ३३.२५ | २.०८ | २३६.९६ | ५०.६० | २७.१५ |
| १९९०-९१ | २५९.१८ | १३.५१ | ३६.८३ | १.९२ | २९६.०१ | ५९.०५ | २४.९२ |
| १९९१-९२ | २४०.२८ | ११.४१ | ३२.४३ | १.५४ | २७२.७१ | -२३.०३ | -७.८७ |
| १९९२-९३ | ३००.४४ | १२.७४ | ५२.९२ | २.२४ | ३५३.३६ | ८०.६५ | २९.९५ |
| १९९३-९४ | ३०२.८५ | १०.९२ | ६५.२४ | २.३५ | ३६८.१९ | १४.८३ | ४.१९ |

संदर्भ :- प्राथमिक शिक्षक बँक अहवाल.

संदर्भ – प्राथमिक शिक्षक बँकेचे वार्षिक अहवाल :-

वरील तक्त्यावरून असे दिसून येते की, प्राथमिक शिक्षक बँकेचा एकूण खर्च वाढत आहे. १९८१ मध्ये दिलेले व्याज १७.६५ लाख रुपये होते. याचे खेळत्या भांडवलाशी प्रमाण ७.२५ लाख रुपये असे होते व व्यवस्थापन खर्च ५.८२ लाख रुपये व याचे खेळत्या भांडवलाशी प्रमाण २.४१ लाख रुपये असे होते. म्हणजेच एकूण खर्च २१.४७ लाख रुपये असा होता. त्यामध्ये वाढ होऊन १९९३–९४ मध्ये दिलेले व्याज ३०२.८५ लाख रुपये झाले व याचे खेळत्या भांडवलाशी प्रमाण १०.९२ लाख रुपये झाले व व्यवस्थापन खर्च ६५.२४ लाख रुपये झाले. याचे खेळत्या भांडवलाशी प्रमाण २.३५ लाख रुपये असे झाले. एकूण खर्च ३६८.१९ लाख रुपये झाला आहे.

१९८१ मध्ये सरासरी वार्षिक वाढ १.९७ लाख रुपये होती व १९९३–९४ मध्ये ती वाढून १४.८३ इतकी झाली आहे. त्याचप्रमाणे १९८१ मध्ये १०.१० टक्के वाढ झाली होती. तीमध्ये वाढ होऊन १९९३–९४ मध्ये ४.१९ टक्के इतकी वाढ झाली. यावरून प्राथमिक शिक्षक बँकेचा खर्च हा दिवसेंदिवस वाढत असल्याचे दिसून येते.

## ४.१२ प्राथमिक शिक्षक बँकेची थकबाकी :-

सहकारी चळवळीची वाढत जाणारी थकबाकी ही एक डोकेदुखी ठरली आहे. वाढती थकबाकी ही बँकेच्या प्रगतीला अडसर बनते. थकबाकीचा हा गंभीर प्रश्न प्राथमिक शेतकी संस्था, मध्यवर्ती सहकारी बँका यांच्याप्रमाणेच नागरी सहकारी बँकांनाही भेडसावत आहे. नागरी सहकारी बँकांच्या कर्ज व्यवहारात जसजशी वाढ होत गेली, तसतसे थकबाकीचे प्रमाणही वाढत गेल्याचे आढळून येते.

थकबाकीचे विश्लेषण केल्यास कर्जदारांची पैसे परत फेडीची पात्रता योग्य रितीने न अजमावने, कर्जदारास जरूरीपेक्षा अधिक कर्ज मंजुर करणे, कर्ज अर्जाची छाननी काळजीपूर्वक न करणे. कर्ज दिल्यानंतर योग्य कालावधीत वसुलीचा पाठपुरावा न करणे. एकाच कारणासाठी मोठ्या प्रमाणावर कर्ज मंजुर करणे इत्यादी अनेक कारणे आढळून येतात. थकबाकीमुळे बँकेच्या आर्थिक परिस्थितीवर ताण पडतो.

प्राथमिक शिक्षक बँकेची थकबाकी :-

१९८१- ते १९९४ या कालावधीत प्राथमिक शिक्षक बँकेची थकबाकी वाढत गेली असल्याचे पुढील तक्त्यावरुन आढळून येते.

तक्ता क्र.४.१०

प्राथमिक शिक्षक बँकेची थकबाकी (आकडे लाखात)

| वर्ष | थकबाकी | सरासरी वार्षिक वाढ | येणे कर्जाशी थकबाकी चे प्रमाणे % |
|---|---|---|---|
| १९८१ | १.५५ | ०.५० | ०.८७ |
| १९८२ | २.१९ | ०.६४ | ०.९१ |
| १९८३ | २.८९ | ०.७ | १.०६ |
| १९८४ | ३.१० | ०.२१ | १.०७ |
| १९८५ | ३.३९ | ०.२९ | ०.८३ |
| १९८६ | ४.८९ | १.५ | ०.९८ |
| १९८७ | ४.८८ | -०.०१ | ०.७७ |
| १९८८ | ४.२८ | -०.६१ | ०.५७ |
| १९८९ | ९.९० | ५.६२ | १.०० |

...

| वर्ष | थकबाकी | सरासरी वार्षिक वाढ | येणे कर्जाशी थकबाकीचे प्रमाण % |
|---|---|---|---|
| १९९० | १५.११ | ५.६२ | १.२० |
| १९९१ | १०.६७ | -४.४४ | ०.७२ |
| १९९२ | ११.१० | ०.४३ | ०.६९ |
| १९९३ | ९.०५ | -२.०५ | ०.५१ |
| १९९४ | १३.०६ | ४.०१ | ०.६४ |

संदर्भ :- प्राथमिक शिक्षक बँक वार्षिक अहवाल.

वरील तक्त्यावरून असे दिसून येते की, १९८१ साली बँकेची थकबाकी १.५५ लाख रुपये होती. तीमध्ये वाढ होऊन १९९४ मध्ये १३.०६ लाख रुपये इतकी झाली आहे. तसेच १९८१ मध्ये थकबाकीचे येणे कर्जाशी प्रमाण ०.८७ टक्के इतके होते.

थकबाकीत अधिक वेगाने वाढ होण्याच्या कारणाने बँकेच्या कर्ज मंजूरीची सदोष प्रक्रिया, कर्ज वसुलीकडे दुर्लक्ष, एकाच कारणासाठी मोठ्या प्रमाणावर कर्ज मंजुर करणे इत्यादी अनेक कारणे दिसून येतात.

प्राथमिक शिक्षक बँकेत कर्ज देताना पगार तारण घेऊन व अन्य वस्तू तारण घेऊन कर्ज दिले जाते. त्यामुळे थकबाकी रहात नाही. कर्ज आपोआपच वसूल होत असते. असे असले तरी सुध्दा प्राथमिक शिक्षक बँकेची थकबाकी वाढत आहे व ही वाढत जाणारी थकबाकी योग्य प्रमाणातच वाढत आहे, असे दिसून येते.

४.१३ प्राथमिक शिक्षक बँकेचा नफा :-

इतर व्यवसायाप्रमाणे बँका सुध्दा एक व्यवसाय करीत असतात. बँकेला उत्पन्न मिळते. उत्पन्नाबरोबरच त्यांना खर्चही करावा लागतो. हा खर्च भागून जे शिल्लक राहते, तो बँकेचा निव्वळ नफा होय. म्हणूनच व्यवसायाचा प्रमुख हेतु नफा मिळविणे हा असतो. ब-याच वेळा नागरी सहकारी बँका व्यवहार व व्यवस्थापन खर्च कमी करून नफा मिळवितात.

प्राथमिक शिक्षक बँकेच्या नफ्यातील वाढीची प्रगती :-

प्राथमिक शिक्षक बँकेला १९८१ ते १९९४ या कालावधीत झालेल्या नफ्यासंबंधीची माहिती पुढील पत्रकात दिली आहे.

तक्ता क्र.४.११

प्राथमिक शिक्षक बँकेच्या नफ्यातील प्रगती (आकडे लाखात)

| वर्ष | निव्वळ नफा | सरासरी वार्षिक वाढीचे प्रमाण | % वाढ |
|---|---|---|---|
| १९८१ | ३.१४ | ०.०९ | २.९५ |
| १९८२ | ३.५९ | ०.४५ | १४.४४ |
| १९८३ | ३.८५ | ०.२५ | ७.३३ |
| १९८४ | ४.०३ | ०.१८ | ४.७६ |
| १९८५ | ४.०५ | ०.०२ | ०.३६ |
| १९८६ | ३.७५ | -०.३० | -७.३७ |
| १९८७ | ४.०८ | ०.३३ | ८.६६ |
| १९८८ | ७.२६ | ३.१८ | ७८.०० |
| १९८९ | ८.१२ | ०.८७ | ११.९६ |
| १९९० | ९.३५ | १.२३ | १५.११ |

...

| वर्ष | निव्वळ नफा | सरासरी वार्षिक वाढीचे प्रमाण | % वाढ |
|---|---|---|---|
| १९९१ | ७.६१ | -१.७४ | -१८.६१ |
| १९९२ | ५.८७ | -१.७४ | -२२.८६ |
| १९९३ | ८.०६ | २.१९ | ६.३६ |
| १९९४ | ८.१७ | ०.११ | १.३६ |

संदर्भ :- प्राथमिक शिक्षक बँकेचे अहवाल.

वरील तक्त्यावरून असे दिसून येते की, ही प्राथमिक शिक्षक बँकेच्या नफ्यात वाढ होत आहे. १९८०-८१ मध्ये ३.१४ लाख रूपये इतका नफा मिळत होता. तो १९९३-९४ मध्ये ८.१७ लाख रूपये इतका मिळाला आहे.

परंतु १९८६ व १९९१, १९९२ मध्ये बँकेला तोटा होताना दिसतो आहे. प्राथमिक शिक्षक बँक ही एक व्यवसाय करणारी बँक असली तरी ही बँक नफ्याला महत्व देत नाही. शिक्षकांची आर्थिक अडचण दूर करणे व त्यांना पैशाची कोणतीही अडचण भासू द्यावयाची नाही हा प्रमुख हेतू या बँके पाठीमागे आहे. त्यामुळेच काही वेळा या बँकेला तोटा सहन करावा लागला आहे आणि जो नफा मिळतो आहे, तोही भांडवलाच्या प्रमाणात कमी वाटतो.

## ४.१४ प्राथमिक शिक्षक बँकेचा सेवक वर्ग :-

प्राथमिक शिक्षक बँकेला पोटनियमाप्रमाणे बँकेत कर्मचारी अधिकारी नेमणेबाबत नियम करणे व सदरहू जागा सरळ भरतीने व अस्तित्वात असलेल्या कर्मचाऱ्यामधून बढती पध्दतीने नेमणेबाबतची पध्दत निश्चित करणे, त्याची शैक्षणिक पात्रता, पगार, भत्ते, याबाबतचे नियम तयार करणे. तसेच शिस्त पालन करण्याचा अधिकार आहे.

बँकेकडे मुख्य कार्यालय सांगली व बँकेच्या सर्व शाखांमध्ये एकूण ९४ कर्मचारी काम करीत आहेत. यामध्ये मॅनेजर अकौंटंट शाखा तपासणी अधिकारी, बोर्ड सेक्रेटरी, शाखाअधिकारी, सुपरवायझर व पेकर असे एकूण २६ कर्मचारी अधिकारी वर्ग म्हणून काम पहात आहे. तसेच १३ कॅशियर व ३८ क्लार्क काम करीत आहेत. तसेच १७ सेवक शिपाई काम करीत आहेत.

सेवकांच्या अविरत परिश्रमामुळे तसेच त्यांच्या सेवाभावी प्रवृत्तीमुळेच बँक एवढा मोठा प्रगतीचा टप्पा गाठू शकली आहे. सर्व कर्मचाऱ्यांचे सभासदांशी संचालकांशी व ग्राहकांशी प्रमाचे व आपुलकीचे संबंध असल्याने बँकेकडील ग्राहक वर्ग हा दिवसेंदिवस वाढत असल्याचे अहवालावरून दिसून येते. बँकेनेही सेवक हा बँकेचा केंद्रबिंदू मानून त्यांना जास्तीत जास्त सोई सवलती देण्याचा प्रयत्न केला आहे.

## ४.१५ प्राथमिक शिक्षक बँकेचा लाभांश :-

सहकाराच्या प्रमुख वैशिष्ठ्यामध्ये अधिकचात सहभाग हे एक प्रमुख वैशिष्ट्य आहे. कारण सहकारी संस्थेवर सभासदांचे नियंत्रण असते. सर्वजण संस्थेच्या कार्यात भाग घेत असतात. त्यामुळे संस्थेने व्यवसायाद्वारे मिळविलेला नफा हा सभासदांनी संस्थेबरोबर केलेल्या व्यवहाराच्या प्रमाणात परत केला जातो. या वैशिष्ट्यानुसार नागरी सहकारी बँकाही व्यवसायापासून मिळालेल्या नफ्यापैकी २५ % नफा राखीव निधीत शिल्लक ठेऊन उरलेला हिस्सा आपल्या सभासदांना त्यांच्या भागांच्या प्रमाणात लाभांशाच्या रूपाने देत असतात.

### प्राथमिक शिक्षक बँकेचा लाभांश :-

१९८९ ते १९९४ या कालावधीत बँकेने आपल्या सभासदांना दिलेल्या लाभांशाची माहिती खालीलप्रमाणे देण्यात आली आहे.

तक्ता क्र.४.१२

प्राथमिक शिक्षक बँकेच्या लाभांश दरातील प्रगती

| वर्ष | लाभांश दर |
|---|---|
| १९८१ | ३.५ टक्के |
| १९८२ | ४.० टक्के |
| १९८३ | ४.०० टक्के |
| १९८४ | ४.० टक्के |
| १९८५ | ४.० टक्के |
| १९८६ | ४.० टक्के |
| १९८७ | ४.० टक्के |
| १९८८ | ४.० टक्के |
| १९८९ | ४.० टक्के |
| १९९० | ४.० टक्के |
| १९९१ | ४.० टक्के |
| १९९२ | ४.० टक्के |
| १९९३ | ४.० टक्के |
| १९९४ | ४.० टक्के |

संदर्भ :- प्राथमिक शिक्षक बँक अहवाल.

वरील तक्त्यावरून असे दिसून येते की, लाभांश ३% ते ५% यामध्ये दिला जातो. प्राथमिक शिक्षक बँकेत रिबेट देण्याची सोय असल्यामुळे लाभांशसमाने नफ्याचा थोडा भाग शिल्लक राहतो व तोही दिला जातो.

४.१६ रिबेट योजना :-

प्राथमिक शिक्षक बँकेत जामिनकी कर्जावरील व्याजावर ३०% पर्यन्त रिबेट देण्याची व्यवस्था (योजना) आहे. सभासदांना रिबेट हे अगोदरच दिल्यामुळे जो नफा शिल्लक राहतो तो थोडाच असतो व तोही लाभांश स्माने वाटला जातो.

१९८१ ते १९९४ या कालावधीत प्राथमिक शिक्षक बँकेत पुढील टक्केवारीने रिबेट वाटप केले आहे.

तक्ता क्र.४.१३

| वर्ष | रिबेट टक्केवारी |
|---|---|
| १९८१ | २० टक्के |
| १९८२ | २० टक्के |
| १९८३ | २० टक्के |
| १९८४ | ५ टक्के |
| १९८५ | १० टक्के |
| १९८६ | १० टक्के |
| १९८७ | १२ टक्के |
| १९८८ | १५ टक्के |
| १९८९ | ५ टक्के |
| १९९० | २४ टक्के |
| १९९१ | २२ टक्के |
| १९९२ | २० टक्के |
| १९९३ | २४ टक्के |
| १९९४ | २२ टक्के |

संदर्भ :- प्राथमिक शिक्षक बँकेचे अहवाल.

वरील आकडेवारीवरून असे दिसून येते की, १९८१ मध्ये रिबेट टक्केवारी २०% होती. ती १९९४ मध्ये २२% इतकी झाली आहे. रिबेट देण्याची टक्केवारी प्रमाण हे प्रामुख्याने नफ्यातील प्रमाण, सभासद संख्या यावर अवलंबून असते.

## ४.१७ प्राथमिक शिक्षक बँकेची ऑडीट वर्गवारी :-

कोणत्याही संस्थेची सांपत्तीक स्थिती पाहण्यासाठी त्या संस्थेची हिशोब पुस्तकांची बुध्दीचातुर्याने व साधक बाधक विचार करून उपलब्ध दस्तऐवज व कागदपत्रे यांच्या आधारे मध्यस्थांच्या भूमिकेतून केलेली छाननी म्हणजे हिशोब तपासणी ( Audit ) होय. नागरी सहकारी बँकांच्या हिशोबाची तपासणी अशाच प्रकारे केली जाते. परंतु बँकेचे व्यवहार सहकारी तत्वानुसार कशाप्रकारे चालला आहे, हे या बँकेत पाहिले जाते.

बँकेच्या आर्थिक परिस्थितीचे मध्यस्था कडून मूल्यमापन होणे, व्यवहारातील आफरातफरी, लबाडी, चुका उघड होणे, त्यावेळी वेळीच कारवाई करता येणे, चुकांचे निराकरण वेळीच होणे इत्यादी अनेक फायदे हिशेब तपासणीमुळे होतात.

नागरी सहकारी बँकांच्या हिशोबाची तपासणी सहकारी खात्यातर्फे प्रतिवर्षी केली जाते. हिशेब तपासणी अंती नागरी सहकारी बँकेला तपासणी वर्ग दिला जातो. "अ", "ब", "क" आणि "ड" अशी या वर्गवारीची मुळाक्षरे असतात. या मुळाक्षरांचा अर्थ पुढीलप्रमाणे .

१. "अ" म्हणजे चांगली उत्तम.
२. "ब" म्हणजे बरी मध्यम प्रतीची.
३. "क" म्हणजे सर्वसाधारण कनीष्ठ प्रतीची.
४. "ड" म्हणजे डबघाईला आलेली.

सहकारी निबंधकांनी ठरविलेल्या मार्गदर्शक तत्वाचे अन्वये ही वर्गवारी दिली जाते. वर्गवारी देताना सहकारी संस्थेची जीवनशक्ती, कारभारातील कार्यक्षमता आर्थिक स्थैर्य, कर्मचारी वर्ग, अंतर्गत नियंत्रण, थकित कर्जे, व्यवस्थापनातील कौशल्य हिशेब, पुस्तकातील व्यवस्थापणा, पूर्वीच्या अहवालाची समाधानकारक दोष दुरुस्ती इत्यादी बाबींचा विचार केला जातो. चांगली वर्गवारी मिळविण्यासाठी नागरी सहकारी बँकांना आपल्या कामाचा वरील बाबींच्या संदर्भात उच्च दर्जा राखणे इष्ट असते. ऑडिट वर्गवारीचा उपयोग, रिझर्व्ह बँकेकडून पुनर्वित सवलती व भाग भांडवलासाठी दिर्घ मुदतीचे कर्ज मिळविणे, स्थानिक संस्थाकडून ठेवी मिळविण्यासाठी पात्र होणे, हमी देण्यासाठी लायक ठरते इत्यादीसाठी होतो.

## प्राथमिक शिक्षक बँकेची ऑडीट वर्गवारी :-

प्राथमिक शिक्षक बँकेला १९८१ ते १९९४ या कालखंडात मिळालेल्या ऑडीट वर्गवारीची माहिती पुढील तक्त्यात दिली आहे.

तक्ता क्र.४.१४

प्राथमिक शिक्षक बँकेची ऑडीट वर्गवारी

| वर्ष | ऑडीट वर्ग |
|---|---|
| १९८० | "अ" वर्ग |
| १९८२ | "अ" वर्ग |
| १९८३ | "अ" वर्ग |
| १९८४ | "अ" वर्ग |
| १९८५ | "अ" वर्ग |
| १९८६ | "अ" वर्ग |
| १९८७ | "अ" वर्ग |
| १९८८ | "अ" वर्ग |
| १९८९ | "अ" वर्ग |

| वर्ष | ऑडीट वर्ग |
|---|---|
| १९९० | "अ" वर्ग |
| १९९१ | "अ" वर्ग |
| १९९२ | "अ" वर्ग |
| १९९३ | "अ" वर्ग |
| १९९४ | "अ" वर्ग |

संदर्भ :- प्राथमिक शिक्षक बँकेचे वार्षिक अहवाल.

वरील तक्त्याचे निरिक्षण करता असे दिसून येते की, प्राथमिक शिक्षक बँकेला १९८१ ते १९९४ पर्यन्त "अ" वर्ग मिळाला आहे. यावरून असा निष्कर्ष निघतो की, प्राथमिक शिक्षक बँकेची कार्यपध्दती अतिशय उत्कृष्ठ आहे.

४.१८ प्राथमिक शिक्षक बँकेचा शाखा विस्तार :-

शाखा विस्तारामागे प्रामुख्याने दोन हेतु असतात. पहिला म्हणजे सभासदांना ज्या ठिकाणी बँकिंग सेवेची सोय नाही अशा ठिकाणी व शक्यतो त्यांच्या निवास स्थानाच्या जवळच अशी सोय उपलब्ध करून देणे. दुसरा हेतू म्हणजे बँकेच्या आर्थिक व्यवहारात वाढ करण्याच्या दृष्टीने ठेवी मध्ये वाढ करणे.

प्राथमिक शिक्षक बँकेचा शाखाविस्तार :-

प्राथमिक शिक्षक बँकेच्या एकूण १४ शाखा आहे. १९९३-९४ या दोन वर्षामध्ये शाखांमध्ये कशा प्रकारची परिस्थिती आहे. याबाबतचा तक्ता पुढे दिला आहे.

तक्ता क्र.४.१५

प्राथमिक शिक्षक बँकेचा शाखाविस्तार [आकडे लाखात]

| अ.क्र. | शाखेचे नाव | शाखा सुरु तारीख | सभासद | | ठेवी | | कर्जे | | निव्वळ नफा | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | | १९९३ | १९९४ | १९९३ | १९९४ | १९९३ | १९९४ | १९९३ | १९९४ |
| १. | कवठेमहांकाळ | १२.१२.१९८० | ५३१ | ५३० | ६४, १७, ०८६ | ६८, ५८, ९५४ | १, ३७, ५८, ३१३ | १, ५९, ६३, ६५९ | १, ३५, ४७१ | २, २३, ६२२ |
| २. | जत | ३.०१.१९८४ | ९८२ | ९०६ | ५६, ५३, ४२७ | ५६, ४६, ९९८ | २, ३२, २२, १६४ | २, ५७, ४४, ३१६ | १, ३२, २३४ | ५, २३, ७१९ |
| ३. | आटपाडी | ४.०२.१९८० | ४७५ | ४६४ | ६०, ७८, ५०८ | ६८, ६८, ४२१ | १, १९, ५३, १०२ | १, ३४, १०, ५८८ | ८६, ७०५ | १, १७, ४२२ |
| ४. | शिराळा | १८.११.१९८३ | ६२० | ६०० | ५९, ९३, १७७ | ६९, ०४, ९३३ | १, २३, ३१, ५७३ | १, २५, ७४, ५४० | ४९, ०५८ | १९, ६०६ |
| ५. | इस्लामपूर | १४.०१.१९८४ | ७६४ | ८३२ | ९६, १२, २८२ | १, ११, ७२, २९४ | १, ५७, ८१, ८५१ | २, ०१, ७७, ५१० | १, ३२, ५१० | २१, ५३९ |
| ६. | विटा | ७.०६.१९८४ | ६७५ | ६६२ | ७०, ३९, ६१३ | ७६, ४५, ३०८ | १, ३८, ५२, ६२१ | १, ५०, ९१, ७३९ | ३८, २५० | १, ४६, ४०३ |
| ७. | तासगांव | २४.०७.१९८४ | ९९७ | १, ०४३ | ७१, ५४, २७६ | ८२, ११, ७३४ | २, २०, ८८, ०९२ | २, ५१, ५५, ०७६ | १, १०, ३९४ | ३, ८९, ७४६ |
| ८. | मिरज | ५.०६.१९८४ | ८२१ | ५८८ | ७४, ०१, ७६२ | ७१, ९२, ९५७ | १, ८०, १३, ०९० | १, ४०, ०२, ७७४ | ९, ४२३ | २, ८०, ५७३ |
| ९. | रामानंदनगर | १०.०९.१९८८ | २७७ | २८८ | ७२, ४१, ३२६ | ९१, ७६, ६३६ | ६७, ६३, ९७० | ७६, ५१, ७७३ | ४९, ८२९ तोटा | १, ३८, ८१८ तोटा |
| १०. | आष्टा | २९.०५.१९८९ | ३५४ | ३८९ | २९, ३५, ९६५ | ४२, ७७, ८३६ | ६९, ४८, ६५८ | ८९, ७६, ८१८ | ३४, १८४ तोटा | ५३, १६१ तोटा |
| ११. | कडेगांव | २३.०१.१९९१ | ३५८ | ४१७ | ४२, ७७, ८५१ | ६९, ७८, ६४८ | ८२, ४३, ७८० | ९५, ८४, ७१० | १८, ९२९ | २८, ११४ |
| १२. | आरग | ३.०१.१९९४ | – | २८२ | – | ८, ३२, ५९८ | – | ६७, ७९, ७२१ | – | १८, ३०२ तोटा |
| १३. | सांगली | १.०४.१९९२ | १, ०१७ | १, ०५० | ९३, ०३, ४९६ | २, ७७, ४७, ७२१ | २, ३३, ४६, ६४९ | २, ६२, ७७, ९७३ | १, ३१, ३७८ | १, ६१, ५८२ |
| १४. | मुख्य कार्यालय | ४.११.१९५२ | २६५ | १८४ | ७, ०८, ३३, ८६४ | ८, २१, ६२, ५८० | २४, १७, ४३५ | ३१, ५७, ७१६ | ३४, ५८५ तोटा | ८, ८५, २३२ तोटा |
| | | एकूण – | ८, १३६ | ८, २३५ | १४, ९९, ५२, ६३३ | १९, १६, २७, ६२७ | १७, ८७, २१, २९८ | २०, ४५, ४८, ४३२ | ८, ३५, ७५४ | ८, १६, ८१४ |

संदर्भ :- प्राथमिक शिक्षक बँक, अहवाल.

| १ | २ | ३ | ४ | ५ | ६ | ७ | ८ | ९ | १० | ११ | १२ |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| १९७५-७६ | ६,८०२ | ४८,५०,६१० | ३,२६,४०८ | ७०,३१९ | १०,७८,१०० | २४,३२,०१४ | १,०४,५८,८०० | ९,४८,६१९ | २६,६७,१६० | ८३,६२६ | १,१७,८१,४१९ |
| १९७६-७७ | ६,९०१ | ६२,३०,८२० | ३,४७,५६३ | ९३,६९७ | १३,०३,१०० | १९,७३,७५८ | १,१०,४४,४९० | १२,४५,२२५ | ३८,२३,५५१ | १,०४,७३७ | १,२६,५७,७५७ |
| १९७७-७८ | ६,९५२ | ६४,५०,६४० | ३,७७,०३३ | १,२९,४०६ | १३,०३,१०० | ३०,४३,१३५ | १,३६,१६,१०० | १६,४१,४४२ | ४२,९८,४३५ | २,६७,०११ | १,५३,६४,६६४ |
| १९७८-७९ | ७,०३० | ६५,८९,७९० | ४,४४,०३५ | १,३१,०२८ | १७,१५,१०० | ३६,१४,९७६ | १,५०,७४,४०२ | १९,०२,०२१ | ५३,२३,५८० | ३,०३,२०३ | १,७३,७०,३६१ |
| १९७९-८० | ७,१५९ | ६७,४४,६३० | ५,१५,१२८ | १,४६,६१६ | २६,८०,९०० | ४८,८३,२६५ | १,०५,४२,०२९ | २०,८८,९४३ | ७०,७९,८१८ | ३,०४,९३१ | २,०८,३६,९४७ |
| १९८०-८१ | ७,२०९ | ६८,१९,५५० | ५,९१,६६३ | १,४५,३८५ | २७,६४,९०० | ४७,२२,१४३ | १,९३,६३,९५५ | २६,१७,११३ | ८८,६०,२५५ | ३,१३,५७२ | २,२८,८४,८५० |
| १९८१-८२ | ७,२३६ | ६८,२२,८२० | ६,७०,५३० | १,६३,६९८ | ३३,६४,९०० | ९८,०५,०२५ | २,५९,३९,८१७ | ३२,६७,४८५ | १,११,१८,९७७ | ३,५८,८५४ | ३,०७,४३,११२ |
| १९८२-८३ | ७,२५१ | ६८,२१,३५५ | ७,६३,६८३ | १,८५,५५२ | ३८,७४,९०० | १,०८,८६,३९१ | २,९३,९५,१६२ | ४२.६५,८५६ | १,३६,१०,६५१ | ३,८५,१६७ | ३,४८,८०,००९ |
| १९८३-८४ | ७,२६१ | ६९,१५,५८० | ८,६०,४८१ | २,२२,८५८ | ५५,७७,४०० | १,०४,३८,८७८ | ३,०७,९०,७२५ | ४७,०६,१०९ | १,७२,५५,७११ | ४,०३,४९५ | ३,८६,८४,६५७ |
| १९८४-८५ | ७,३२१ | ६९,०१,७१० | ९,६७,५६३ | ३,०६,६६२ | ७७,३८,९०० | १,८६,७०,४८७ | ४,०९,२३,०५३ | ५३,२९,४३३ | २,४१,९३,०५९ | ४,०४,९६५ | ५,४४,२०,२९३ |
| १९८५-८६ | ७,३८७ | ६८,९०,२६५ | १०,७३,६७१ | ३,३८,४०१ | ८९,४८,९०० | १,९८,०७,२१८ | ४,९९,१२,५६८ | ७३,८९,८०९ | ३,२८,४६,७१५ | ३,७५,१२० | ६,५५,४३,४६२ |
| १९८६-८७ | ७,३९७ | १,०३,५३,४९० | ८,४६,५७४ | ६,६९,११० | १,२५,२३,९०० | २,६५,७३,१६६ | ६,३०,९६,८६२ | ९५,७९,५८९ | ३,९०,०६,०८३ | ४,००,६२४ | ८,४०,४७,६८१ |
| १९८७-८८ | ७,४४३ | १,२९,९०,३८५ | १०,८७,१७२ | १३,४५,९७० | १,३८,७८,९९० | २,५६,०२,५९६ | ७,५५,४९,९३० | १,५२,४९,६८३ | ४,८१,६७,४७० | ७,२५,५५१ | ९,७९,१४,०११ |
| १९८८-८९ | ७,६३६ | १,३९,५३,३६० | १४,९४,०६८ | २१,२५,९१४ | १,६३,६३,९०० | ३,८१,५९,३५४ | ९,९४,५३,८५८ | १,९१,३७,४७७ | ५,८४,१६,५४७ | ८,१२,३०८ | १२,५५,५०,६९० |
| १९८९-९० | ७,८४७ | १,४२,८६,२०० | १७,०३,६८७ | २३,४८,७५६ | २,२३,०१,९०० | ४,७८,२२,७७४ | १२,५३,३६,००९ | २४,३७,७७८ | ७,८९,३८,१७६ | ९,३५,०६४ | १५,९६,७२,५९१ |
| १९९०-९१ | ८,००९ | १,४४,९६,४२० | १९,५१,९३० | २५,५६,३९२ | २,७८,१६,९०० | ४,७५,८१,०९८ | १४,९०,७६,८६५ | २,९९,८९,९२९ | १०,७६,२८,२२९ | ७,६१,१६० | १९,१७,८२,८०१ |
| १९९१-९२ | ८,१५३ | १,४८,२५,६४० | २१,५१,२०५ | २८,०७,५८५ | ३,०२,१६,९०० | ४,९५,२८,५३० | १६,०४,६६,२६४ | २,७५,१२,६२८ | १२,३६,३५,५१९ | ५,८६,५०४ | २१,०६,४१,०६५ |
| १९९२-९३ | ८,१३६ | १,५०,२३,४५० | २३,२९,४३५ | ३१,६०,२६७ | ३,७२,१६,९०० | ४,५५,९६,८८० | १७,८७,२१,२९८ | ३,५८,६०,९६१ | १४,९९,५२,६३३ | ८,०५,७५४ | २३,५८,४२,६१६ |
| १९९३-९४ | ८,२३५ | १,५१,४४,७६० | २५,४३,४६४ | ३२,७०,०११ | ५,०८,३९,४०० | ४,५३,०६,६९८ | २,०४,५५,४८,४३२ | ३,७२,६१,२८४ | १९,१६,२७,६२७ | ८,१६,८१४ | २७,७३,४४,२११ |

संदर्भ :- सांगली जिल्हा प्राथमिक शिक्षक सहकारी बँक - स्मरणिका, १९९१.

प्राथमिक शिक्षक बँकेच्या एकूण १४ शाखांमध्ये सभासद, कर्ज, ठेवी याबाबतची परिस्थिती चांगली आहे. यापैकी रामानंदनगर, आष्टा, आरग, मुख्य कार्यालय या चार शाखांना १९९४ मध्ये तोटा झाला असल्याचे दिसून येते. ठेवींचे प्रमाण जास्त व कर्जाचे प्रमाण जास्त असेल तर तोटा होण्याची शक्यता असते. त्याचप्रमाणे व्यवस्थापन खर्च, अगाऊ नोकर भरती, शाखांच्या इमारतीचे भाडे म्हणजेच एकूण खर्च वाढल्यानंतरही अशा प्रकारचा तोटा संभवतो.

....

## संदर्भ


१) प्राथमिक शिक्षक बँक - अहवाल.

२) स्मरणिका - १९९१.

३) प्राथमिक शिक्षक बँक - स्मरणिका - १९७७,
बँकेचा रौप्यमहोत्सव.

४) प्राथमिक शिक्षक बँक मुख्य कार्यालय, सांगली - येथील माहिती
घेण्यात आली.


.....